प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेता नाशिक एच.ओ. मधून वितरित केला जातो.
सवलतीच्या दराची तिकीटे लावून पोस्टाने पाठविण्याचा परवाना REGD-NSK/२८९/२०१९-२१
रजि. नंबर आर. एन. २१४०२/१९७५ रजिस्टर्ड वुईथ रजिस्टार ऑफ न्यूजपेपर इंडिया

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक
रजि. नं. इ-२८२

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिकचे मासिक मुखपत्र

# सन्मार्गमित्र

सन्मार्ग दर्शयत सम्यक। प्रेरयेत निजकर्मणी। सन्मार्गमित्रं सर्वेषाम। भयता आनंद वर्धनम् ।।

नाशिक । वर्ष ५२ वे । अंक ५ ।ऑक्टोबर २०२३ (मासिक) । मूल्य १० रुपये



## दिनविशेष

२९ ऑक्टोबर :– जागतिक स्ट्रोक दिन.

३० ऑक्टोबर :– आंतरराष्ट्रीय ऑर्थोपिडिक परिचारिका दिन.

३१ ऑक्टोबर :– जागतिक बचत दिन राष्ट्रीय एकता दिन.

१ नोव्हेंबर :– जागतिक शाकाहार दिन

२ नोव्हेंबर :– भारतीय आगमन दिन

५ नोव्हेंबर :– मराठी रंगभूमी दिन

८ नोव्हेंबर :– जागतिक शहरीकरण दिन, आंतरराष्ट्रीय रेडिओलॉजी दिन

९ नोव्हेंबर :– धन्वंतरी दिन, कायदाविषयक सेवादिन

१० नोहेंबर :– जागतिक विज्ञान दिन

११ नोव्हेंबर :– राष्ट्रीय शिक्षण दिन

१२ नोव्हेंबर :– जागतिक न्युमोनिया दिन

१३ नोव्हेंबर :– जागतिक दयाळूपणा दिन

१४ नोव्हेंबर :– जागतिक मधुमेह दिन राष्ट्रीय बालदिन

१६ नोव्हेंबर :– आंतरराष्ट्रीय सहनशीलता दिन

१७ नोव्हेंबर :– जागतिक पूर्व परिपक्वता दिन,

१७ नोव्हेंबर :– आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन

१९ नोव्हेंबर :– जागतिक शौचालय दिन,

१९ नोव्हेंबर :–आंतरराष्ट्रीय पुरुष दिन, महिला उद्योजकता दिन

२० नोव्हेंबर :– आंतरराष्ट्रीय बालदिन

२१ नोव्हेंबर :– जागतिक टेलिव्हिजन दिन

२४ नोव्हेंबर :– उत्क्रांती दिन

२५ नोव्हेंबर :– आंतरराष्ट्रीय महिलांविरुद्ध हिंसा निर्मूलन दिन

### सण वार

२८ ऑक्टोबर – कोजागिरी पोर्णिमा

०९ नोव्हेंबर :– वसुबारस

१२ नोव्हेंबर :– नरक चतुर्दशी,

१२ नोव्हेंबर :– लक्ष्मीपूजन

१४ नोव्हेंबर :– बलिप्रतीपदा, दीपावली पाडवा

१५ नोव्हेंबर :– भाऊबीज

२३ नोव्हेंबर :– तुलसी विवाह प्रारंभ

**सर्व सभासद, कार्यकर्ते, समिति सभासद, तसेच वाचक यांना सन्मार्ग मित्र समिति तर्फे दिपावली आणि नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

## सर्व संभासदाना आणि वाचकांना विनम्र विनंती

संस्थेची वार्षिक सभासद वर्गणी (₹५००/–) तसेच सन्मार्गमित्र ची वार्षिक वर्गणी (₹१००/–) असे एकूण ₹६००/– किंवा प्रत्येकी, खाली दिलेल्या बँकेच्या खात्यात भरून आम्हाला सहकार्य करावे.

**बँकेचे नाव : बँक ओफ बडोदा , गोल्फ क्लब , नाशिक**

**खात्याचा प्रकार : बचत खाते**

**खात्याचे नाव:अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था , नाशिक ,**

**अकाऊंट नं :१७६६०१०००१४६४७**

**आय. एफ. एस. सी. कोड : BARB 0GOLFCL**

संस्थेची वार्षिक सभासद वर्गणी जमा केल्याची माहिती संस्थेचे **कोषाध्यक्ष अनिल मोहिनीराज देशपांडे,** यांना " 9423034689"नं वर मेसेज द्वारे कळवावे. तसेच सन्मार्गमित्र अंकांची वार्षिक वर्गणी जमा केल्याची माहिती **संपादक सौ. अपर्णा मोडक** यांना "८६०५५६६१२८" वर मेसेज द्वारे कळवावे.


## विघ्नहर्ता वधु - वर सहायक मंडळ

**नाव नोंदणी फक्त वेबसाईटवर**

**ऑनलाईन पद्धतीनेच करता येणार आहे.**

**अधिक माहिती साठी वेबसाईट:**

**vighnahartamatrimony.com**

नवरात्र आणि दिवाळी निमित्त खास ऑफर

ऑनलाइन रजिस्ट्रेशन फक्त रु ५००/–

आजच ह्या विशेष सवलतीचा लाभ घ्या.

वर दिलेल्या लिंक वर क्लिक करा

**नावनोंदणी पुढील १ वर्षासाठी असेल.**

मासिक

# सन्मार्गमित्र

दर महिन्याच्या २५ तारखेला प्रसिद्ध होणारे संस्थेचे मुखपत्र
वार्षिक वर्गणी रुपये १००/-
अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक
जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबलजवळ,
त्र्यंबकरोड, नाशिक ४२२००२.
फोन: ०२५३-२३१३५९९
website: www.abmsanstha.org
**email:** sanmargmitra2021@gmail.com

**संपादक : सौ. अपर्णा मोडक**
**प्रकाशक :श्री. उदयकुमार मुंगी**

सन्मार्गमित्र हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांच्यासाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी पुणे येथून पिडिएफ स्वरुपात तयार करुन (छापून) अखिल ब्राह्मण मध्यवर्ती जलशुद्धीकरण केंद्राजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक: ४२२००२ येथे प्रसिद्ध केला. (या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा. म. संस्था सहमत असेलच असे नाही)

## सन्मार्गमित्र

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक
सर्व कार्यकारिणी सदस्य व सभासद

आपल्याला वाचनाचा कंटाळा येतो, पुरेसा वेळ नसतो, वाचन केले की डोळ्यांची जळजळ होते. काळजी नसावी. खास आपल्या सोईसाठी, लेखकांच्या / संकलकांच्या आवाजात/ शैलीमध्ये. ज्या लेखाच्या (मंथळ्याच्या) नावाखाली निळ्या रंगात एक ओळ असेल त्यावर क्लिक (टच) केल्यावर आल्याला थेट आपल्या यू ट्यूब चॅनल वरील त्या विशिष्ठ लेखा पर्यन्त पोहोचता येईल.

आणि असेच आपले लेख लेखकाच्या आवाजात ऐकण्यासाठी ते आपल्या सुस्पष्ट आवाजात रेकॉर्ड करून आम्हाला पाठवावेत सन्मार्ग मित्राच्या ऑफिशियल ई-मेल आयडीवर वर पाठवा.

(sanmargmitra2021@gmail.com)

**संपादक : सौ. अपर्णा मोडक**

सन्मार्गमित्र

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

## सभासदांना सूचना

सन्मार्ग मित्र या अंकासाठी आपले लेख पाठविताना लक्षात ठेवून करायच्या गोष्टी :

१. आपले लेख मराठी भाषेतच असावेत. शक्यतो टाईप केलेले किंवा सुवाच्च अक्षरातील असावेत.
२. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
३. प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत खाली नमूद केलेल्या ई-मेल आयडी आणि व्हॉटस् ॲप क्रमांकावर आपले लिखाण पाठवावे.
४. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरून लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
५. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
६. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

व्हॉटस् ॲप नं.: ८६०५५६६१२८ इमेल आयडी : **sanmargmitra2021@gmail.com**

**कोरोना आला आणि भारतात शिक्षक 'दीन' झाला.**

खरंतर भारतातील शिक्षक कोरोनाआधीसुद्धा दीनच होता. म्हणजे ५ सप्टेंबरला शिक्षक किती महान असतात, याचे गोडवे गातात; पण व्यवहारात शिक्षकांना तेवढा सन्मान मिळत नाही. जे प्रोफेशन जगातल्या इतर प्रोफेशन्सना घडवतात त्या शिक्षकी पेशाला आदर, मान, सन्मान रोजच्या जगण्यात नसतो. हल्ली विद्यार्थी, पालक यांच्या मनात शिक्षकांविषयी प्रेम दिसत नाही. संस्थाचालकांना वाटतं, शिक्षक म्हणजे आपले नोकरच आहेत. हवं ते काम सांगा. राजकारण्यांना वाटतं शिक्षक म्हणजे मोठी वोट बँकच आहे. आपली राजकारणातली कामं सांगायचं हक्काचं व्यासपीठ. सरकारला वाटतं, कोणत्याही योजना अमलात आणायच्या असतील, तर 'बिनपगारी फुल अधिकारी' म्हणजे शिक्षक. त्यांना हल्ली अशैक्षणिक कामांत इतकं अडकवून ठेवलं जातं, की ते शिकवायचं विसरून जातील. एवढं होऊनही शिक्षक वस्त्या-वस्त्यांत, गावा-गावांत, पाड्यांवर शिकवतात. ग्रामीण ते शहरी भागात सगळीकडे शिक्षक ज्ञानदानाचं कार्य करतात. पालकांनो, तुम्ही जर या पेशाला मान-सन्मान दिला नाही, संस्थाचालकांनी त्यांना चांगला मोबदला दिला नाही, तर या पेशात उत्तम दर्जाचं मनुष्यबळ येणार नाही. चांगले, ज्ञानी शिक्षकी पेशातून निघून जातील किंवा हा पेशा करिअर म्हणून निवडणार नाहीत. मग तुमची-आमची मुलं घडतील कशी? हो, अशी परिस्थिती आली आहे.

खरंतर भारतातील शिक्षक कोरोनाआधीसुद्धा दीनच होता. म्हणजे ५ सप्टेंबरला शिक्षक किती महान असतात, याचे गोडवे गातात; पण व्यवहारात शिक्षकांना तेवढा सन्मान मिळत नाही. जे प्रोफेशन जगातल्या इतर प्रोफेशन्सना घडवतात त्या शिक्षकी पेशाला आदर, मान, सन्मान रोजच्या जगण्यात नसतो. हल्ली विद्यार्थी, पालक यांच्या मनात शिक्षकांविषयी प्रेम दिसत नाही. संस्थाचालकांना वाटतं, शिक्षक म्हणजे आपले नोकरच आहेत. हवं ते काम सांगा. राजकारण्यांना वाटतं शिक्षक म्हणजे मोठी वोट बँकच आहे. आपली राजकारणातली कामं सांगायचं हक्काचं व्यासपीठ. सरकारला वाटतं, कोणत्याही योजना अमलात आणायच्या असतील, तर 'बिनपगारी फुल अधिकारी' म्हणजे शिक्षक. त्यांना हल्ली अशैक्षणिक कामांत इतकं अडकवून ठेवलं जातं, की ते शिकवायचं विसरून जातील. एवढं होऊनही शिक्षक वस्त्या-वस्त्यांत, गावा-गावांत, पाड्यांवर शिकवतात. ग्रामीण ते शहरी भागात सगळीकडे शिक्षक ज्ञानदानाचं कार्य करतात. पालकांनो, तुम्ही जर या पेशाला मान-सन्मान दिला नाही, संस्थाचालकांनी त्यांना चांगला मोबदला दिला नाही, तर या पेशात उत्तम दर्जाचं मनुष्यबळ येणार नाही. चांगले, ज्ञानी शिक्षकी पेशातून निघून जातील किंवा हा पेशा करिअर म्हणून निवडणार नाहीत. मग तुमची-आमची मुलं घडतील कशी? हो, अशी परिस्थिती आली आहे. कोरोनामुळे कितीतरी खासगी शाळा बंद पडल्या. पालकांच्या आणि सरकारच्या चुकीच्या दृष्टिकोनामुळे शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली. आज बरेच शिक्षक शेतावर काम करताहेत. पार्टटाइम ट्युशन्स घेताहेत. तर बाकी वेळ छोट्या- मोठ्या दुसऱ्या नोकऱ्या शोधताहेत. उत्तम ऑनलाइन शिक्षण देण्यात यशस्वी झालेल्या शाळांतील शिक्षकांनासुद्धा स्वतःला तंत्रज्ञानावर आधारित नवं कौशल्य शिकायला खूप संघर्ष करावा लागला. पण त्यांनी तो केला. पहिले ऑनलाइन स्क्रीन शिकण्याचा संघर्ष, मग नेटवर्क मिळवण्याचा, घरातील सर्व सदस्यांसमोर शिकवण्याचा, मग गुगल क्लासरूमवर विद्यार्थ्यांना कंट्रोल करण्याचा, मग त्या विद्यार्थ्यांजवळ त्यांच्या महान आया बसलेल्या असतात, फक्त शिक्षकांच्या चुका काढण्यासाठी. त्यांना न चिडता, हसून समजून घेऊन, बऱ्याच वेळा अपमान गिळून, पुन्हा आनंदी मूडने शिकवायला सुरवात करणं... अशा अनेक संघर्षांतून हे शिक्षक गेले. विद्यार्थ्यांना चुकीची माहिती जाऊ नये म्हणून एक व्हिडिओ अनेक वेळा रेकॉर्ड केला. तो शंभर वेळा एडिट केला आणि विद्यार्थ्यांना शेअर केला. पालकांनो, विचार करा की आपल्या चिमुकल्यांना ऑनलाइन शिक्षण मिळालं नसतं, तर ही दोन वर्षे कशी गेली असती? असा विचार करा, की या टीचर्सनी स्वतःमध्ये बदल केला नसता तर? तुमच्या मुलांचा किती लर्निंग लॉस झाला असता? मुख्य म्हणजे या शिक्षकांमध्ये ५० वर्षे वयाचे उत्तम गणित, शास्त्र शिकवणारे शिक्षक आहेत. ज्या वयात आराम करायचा असतो, त्या वयातील ज्येष्ठ अनुभवी शिक्षकांना हे सर्व नवीन कौशल्य शिकावं लागलं. फक्त विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये म्हणून आणि त्यांच्या प्रेमापोटी शिक्षकी पेशाला समर्पित केल्यामुळे त्यांनी ऑनलाइन शिक्षणाचं कौशल्य आत्मसात केलं. त्यांची मुलं मोठी झाली आहेत, चांगली नोकरी करतात. त्यांनी वडिलांना/आईला सांगितलं, की या वयात दहा -दहा तास स्क्रीनवर काम करण्यापेक्षा नोकरी सोडून द्या. तुमच्या तब्येतीवर परिणाम होतो. चार तास शिकविण्यासाठी स्क्रीनवर सहा तास अधिकचा वेळ खर्च करावा लागतो. तेव्हा हे शिक्षक म्हणतात, 'अरे बाळा, तुझ्या टीचर्सनी पंधरा- वीस वर्षांपूर्वी असा विचार केला असता तर? तुला आज चांगली नोकरी

लागली असती का रे?' वाईट याचं वाटतं, की ज्या घरात दुसरं कोणी कमावणारं नसतं आणि या शिक्षकांच्या पगारावर घर चालतं, तेव्हा त्यांची परिस्थिती बघवत नाही. बऱ्याच संस्थाचालकांनी नाइलाजाने शिक्षकांचा पगार ५० टक्के केलाय. त्यांचीपण मजबुरी आहे. आधीच बँकेचं कर्ज काढलेलं, त्यात बऱ्याच संस्थाचालकांनी शिक्षकांचं घर चालावं म्हणून अधिकचं कर्ज काढलं. भारतात ६६ टक्के विद्यार्थी खासगी शाळेत शिकतात. त्यांचे लाखो शिक्षक कोरोनामुळे 'दीन' होत आहेत. म्हणून मी म्हणालो, 'शिक्षक दिनाला शिक्षक 'दीन' होत आहे. हे थांबवायचं असेल, तर त्या प्रत्येक शिक्षकाच्या पाठीशी उभे राहा. या कोविडमध्ये त्यांनी असामान्य कर्तव्य बजावलं आहे. तंत्रज्ञान महान शिक्षकांची जागा घेऊ शकत नाही, पण महान शिक्षकांच्या हाती जेव्हा तंत्रज्ञान जातं, तेव्हा परिवर्तन होतं. समाज म्हणून आपण सर्वांनी या महान शिक्षकांच्या पाठीशी उभं राहिलं पाहिजे. कितीतरी सरकारी शिक्षकांनी कोविडकाळात नोकरी केली. त्यामुळे त्यांना प्राणही गमवावे लागले. आपण इतकं असंवेदनशील होऊन चालणार नाही, की शिक्षक 'दीन' होतोय आणि आपल्याला काही फरक पडणार नाही. अशीच असंवेदनशीलता दाखवली, तर उद्याची पिढी दीन झालेली तुम्हाला चालेल का? नाही ना? मग चला, खऱ्या अर्थाने शिक्षक दिन साजरा करू. तुमच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षकांना फोन करा, मेसेज नाही, फोनच करा आणि मनापासून Thank you म्हणा आणि sorry सुद्धा..! 'आम्ही तुम्हाला चुकीचं आणि लागेल असं बोललो असू तर माफ करा. तुम्ही ग्रेट आहात.' बघा, शिक्षक काय म्हणतील... फोन ठेवल्यावर ते फक्त डोळे पुसतील.

पावित्र्य, सदाचार, विश्वास, ज्ञान, सुख आदी सगळ्या शब्दांचा पर्याय हा शिक्षकच आहे. नैतिकता आणि चारित्र्य हेच शिक्षकांचे खरे भांडवल असते. तेच संपन्न असले पाहिजे.

शिक्षकांचा पहिला धर्म सर्वांच्या शिक्षणासाठी समभावनेने झटणे हा आहे. समाजाला राजकीय आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करणे हा आहे. श्रीमंत आणि गरीब, उच्च नीच हा भेदभाव शैक्षणिक धोरणाला कलंक फासणारा आहे. आम्हाला आमच्या शाळेची, आमच्या अध्यापनाची अशी प्रणाली बनवली पाहिजे. ज्यातून शिक्षक हा अशा व्यवसायाशी निगडित असेल जो समाजाच्या वैभवशाली भविष्याची निर्मिती करील.

आज शिक्षकांना वाटते की, पालकांना आपल्या पाल्यांची पर्वा नाही. पालकांना वाटते की, शिक्षक विद्यार्थ्यांकडे लक्ष देत नाहीत आणि मुलांना वाटते की, दोघेही आपल्याला समजून घेत नाहीत, तसेच शाळा संचालकांचे यातून कसा आपला उद्योग वाढवता येईल आणि मंडळाची सांपत्तिक स्थिती, प्रतिष्ठा आणि राजकीय वर्चस्व कसे अबाधित राहील याकडे जास्त लक्ष असते. अनेक शाळांत मुलांना नववीपर्यंत पास केले जाते. परिणामी ही मुले दहावीत नापास होतात आणि शाळेला रामराम ठोकतात. शिक्षणाचे झालेले बाजारीकरण आज देशापुढे सर्वांत मोठे आव्हान आहे. शिक्षक बनण्याचा ज्यांच्याकडे एकही गुण नाही ते शिक्षक बनले आहेत. मुलांना समभावनेने न शिकवणे, वरिष्ठांची हांजीहांजी करणे असे शिक्षक या शिक्षकी पेशाला कलंकित करत आहेत.

विद्यार्जन करणारे विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे संबंध जिव्हाळ्याचे असायला हवेत. तसेच मजबूत समाज घडविण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचा मिळून भक्कम सेतू बांधण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांनी स्वतःमध्ये ज्या उणिवा आहेत त्या दूर केल्या तर आपले अध्ययनाचे कार्य अधिक प्रभावशाली आणि योग्य रीतीने करू शकेल. आजच्या माहितीयुगात विद्यार्थी आणि सातत्याने शिक्षक असल्यामुळे शिक्षकांनी आपली कार्यतत्परता वाढवली पाहिजे. शिक्षकांनी ग्रंथालयात जाऊन अत्याधुनिक पुस्तके, मासिके यांचा उपयोग करून आपली ज्ञानलालसा सतत जागृत ठेवली पाहिजे. जो रात्रंदिवस ज्ञान मिळविण्यासाठी धडपडतो आणि विद्यार्थ्यांना ज्ञान देतो, तोच खरा तळमळीने कार्य करणारा शिक्षक असतो आणि तिच त्याची खरी कर्तव्यपरायणता असते. आपल्या वाट्याला आलेले कार्य कुशलतेने, आनंदीवृत्तीने, बिनचूकपणे, वेळेत, नियमांच्या अधीन राहून करायला हवे. आज अनेक शिक्षक केवळ वर्गात शिकवून मोकळे होतात, तर काही शिक्षक पूर्वतयारी न करता वर्गात पुस्तक उघडून धडाधड पाठ वाचत सुटतात. नंतर गृहपाठ देऊन मोकळे होतात. आपण काय शिकवले हे विद्यार्थ्यांच्या डोक्यात शिरले की नाही याबद्दल आस्था नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अडचणीचे बहुधा निवारण होत नसल्यामुळे ते गाईडचा उपयोग करतात, नाही तर शिकवणीवर भर देतात. आज अनेकजण शिक्षक बनतात ते आवडीने नव्हे तर धनसंपत्ती आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी.

गावांतील शाळांत अजूनही छडी लागे छम छम, विद्या येई घम घम अशाच पद्धतीने शिकवले जाते. शिक्षकांनी मुलांवरचे दडपण कमी केले तर वर्गातील वातावरण प्रेरणादायी होऊन शिक्षण आनंदमय होईल.

## अभिनंदन

आयआयटीमुंबई ॲल्युमिनि असोसिएशनच्या नाशिक चैप्टरचे प्रेसिडेंट, आणि आपल्या अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे युवक शाखा प्रमुख, ऊर्जा आणि पर्यावरणविषय अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते निखिल कुलकर्णी ह्यांनी अमेरिकेमध्ये झालेल्या ईमर्जिंग लीडर्स अलायंस परिषदेमध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन. इंजीनियरिंगच्या विविध शाखांच्या संस्थांमार्फत जगभरातून निवड करून मोजक्या तरुण आणि तज्ञ प्रतिनिधींची सदर परिषद पिट्सबर्ग येथे संपन्न झाली. निखिल कुलकर्णी ह्यांनी सोसायटी ऑफ पेट्रोलियम इंजीनियर्सच्या वतीने प्रतिनिधीत्व केले, सुमारे सव्वा लाख सभासदांमधून निखिल कुलकर्णींची कौतुकास्पद निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष,कार्यवाह तसेच उपाध्यक्ष आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी अभिनंदन केले आहे. नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण साधारण सभेमध्ये त्यांचे खास अभिनंदन करण्यात आले.




## नवरात्र म्हणजे निर्मितीशक्तीचं पूजन

नवरात्र म्हणजे निर्मितीशक्तीचं पूजन, ही पूजा नऊ दिवसंच का असा प्रश्न मनात येतो. नऊ या ब्रह्मसंख्येचं आणि निर्मितीशक्तीचं अतूट नातं आहे. अंकांमध्ये नऊ हा सर्वात मोठा अंक आहे. बी जमिनीत गेल्यावर नऊ दिवसांनी अंकुरतं, रोप उगवतं. गर्भधारणा झाल्यापासून नऊ महिने नऊ दिवसांनी मूल जन्माला येतं. म्हणून निर्मितीशक्तीची पूजा नऊ दिवस केली जाते. या नऊ दिवसांच्या उपासनेला नवरात्र म्हटलं जातं. देवीसमोर नऊ दिवस वाढत्या पुष्पमाला आणि अखंड दीप लावला जातो. नवरात्राचा पहिला दिवस म्हणजे घटस्थापना. घट स्थापन करून धान्य रूजत घातलं जातं. घटस्थापना म्हणजे शास्त्रशुद्ध बीजपरीक्षण होय. घटस्थापनेचा दिवस प्राचीन कृषीसंस्कृतीतला महत्त्वाचा दिवस होय. घटस्थापनेचा संबंध प्राचीन कृषीसंस्कृती आणि शेतकरी ज्यांच्यामुळे आपलं पोट भरतं त्याप्रती कृतज्ञता व्याक्त करण्याचा दिवस. या दिवसांत शेतातील पिकांची कापणी झालेली असते. घरी नवीन धान्य आलेलं असतं. या धान्याचं शास्त्रशुद्ध परीक्षण केलं जातं तोच हा दिवस. घटासमोर एका टोपलीत किंवा परडीत आपल्या शेतातील माती आणून त्यात नवीन धान्य रूजत घातलं जातं. दस–यापर्यंत ते पीक त्या घटासमोर उगवतं. पार्थिव गणेश याचं पूजन जसं पृथ्वीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी करायचं असतं तसं पृथ्वीच्या या मातीतून जे धान्य पिकवलं जातं त्या निर्मितीशक्तीची/ आदिशक्तीची ज्यातून आपलं पोट भरतं तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धान्याचीही पूजा केली जाते. कालानुरूप खूप गोष्टी बदलतात तसं आताच्या धावपळीच्या काळात अखंड दीप हा ज्ञानाचा, जागरूकतेचा तेवत ठेवायची गरज आहे तसंच नवीन पेरलेलं धान्य रूजून वाढतं त्याचं पिक उगवतं तसंच काळानुसार नवीन गोष्टी आत्मसात करून कार्यरत राहायचं आहे आणि प्रगती करायचा प्रयत्न करायचा आहे हा संदेश या उत्सवातून आपल्याला मिळतो. म्हणूनंच देवीला प्रार्थना करायची,

या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ।
या देवी सर्वभूतेषु शक्तीरूपेण संस्थिता
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ।

**सौ. निरजा मोडक**

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या** पुणे केंद्राचा सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करतानाच्या दिवसाची सुरुवात सत्यनारायण पूजेने आणि सायंकाळच्या सुश्राव्य संगीत मैफिलीने झाली. सत्यनारायन पूजेचा मान श्री व सौ संदीप खर्डेकर यांना देण्यात आला.

**ह्या दोन्ही कार्यक्रमाची क्षणचित्र**














## मराठी उद्योजक घडविण्याची गरज – दिलीप कोटीभास्कर

मराठी माणूस हा आतापर्यंत नोकरी मागणारा किंवा नोकरीच्या माध्यमातून इतरांच्या विकासासाठी काम करणारा म्हणून ओळखला जात होता. परंतु हळूहळू ही ओळख बदलत आहे, नोकरी मागणा–यांपेक्षा नोकरी देणारा व्यावसायिक घडविणे ही आता काळाची गरज आहे. त्यामुळेच तरुणांना अधिकाधिक उद्योगांकडे वळवून मराठी उद्योजक घडविणे आवश्यक आहे, असे मत प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक दिलीप कोटीभास्कर यांनी व्यक्त केले.

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक) पुणे केंद्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन टिळक स्मारक मंदिर येथे करण्यात आले होते. यावेळी स्वागताध्यक्ष चंद्रशेखर जोशी, पुणे केंद्राचे प्रमुख मकरंद माणकीकर, कार्यवाह विश्वनाथ भालेराव आदी यावेळी उपस्थित होते. संस्थेतर्फे माजी आमदार मेधा कुलकर्णी, माजी आमदार मोहन जोशी, माधव भंडारी, पुणे शहर पोलीस उपायुक्त संदीप कर्णिक यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

दिलीप कोटीभास्कर म्हणाले, पुढील पन्नास वर्ष देशाच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. अशावेळी केवळ नोकरी मागणारा तरुण घडविण्यापेक्षा नोकरी देणारा तरुण आपण घडविला तर समाजामध्ये अधिकाधिक नोकऱ्या निर्माण होऊ शकतील. आतापर्यंत मराठी माणूस हा केवळ नोकरी मागणारा आणि त्यानुसार शिक्षण घेणारा म्हणून ओळखला जातो. परंतु आता ही ओळख पुसण्याची गरज आहे. उद्योग करण्याची मानसिकता आपण तरुणांमध्ये रुजविले पाहिजे.

माधव भंडारी म्हणाले, कोणतीही संस्था पन्नास वर्षे अविरत कार्यरत ठेवणे, अत्यंत अवघड काम आहे. या संस्थेने केवळ काही विशिष्ट समाजासाठीच नव्हे तर संपूर्ण समाजाचा विचार करून त्यानुसार आपले काम केले आहे. त्यामुळेच समाजातील तळागाळातील माणूस या संस्थेची जोडला गेलेला आहे. त्यामुळे या संस्थेची पुढील पन्नास वर्षे हे

निश्चितच गौरवशाली असणार आहेत.



**सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या बोधचिन्हाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले.** मध्यवर्ती संस्थेतर्फे पुणे केंद्राला यावेळी ५१ हजार रुपयांची मदत करण्यात आली. स्वरोत्सव या हिंदी मराठी गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आले होते. मुग्धा पंडित यांनी सूत्रसंचालन केले. मकरंद माणकीकर यांनी स्वागत केले. विश्वनाथ भालेराव यांनी प्रास्ताविक केले. अनिल शिदोरे यांनी आभार मानले. ह्या प्रसंगी सर्व केंद्रांच्या प्रतींनिधीचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वाचे मन:पूर्वक आभार .

## प्रतिक्रिया

सदर कार्यक्रमाच्या संयोजन- आयोजनात सक्रिय असलेल्या सर्व क्रियाशील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे.माणूस हा समाजशील असल्याने त्याचा सांस्कृतिक क्षेत्रात वावर असणं आनंददायी आरोग्यदायीच असतं; त्या आनुषंगाने कला गुणांना वाव देणं हेदेखील उचित असून,गाण्याच्या मैफलीत गाण्यांच्या सुरात टाळ्यांच्या ठेक्यावर सूर मिसळून ही स्वरमयी स्वरसंध्या साजरी होऊन, हा स्वरोत्सव सर्वार्थाने संस्मरणीय झाला. एकूनच हर्षोल्लास, शिट्या,टाळ्यांचा कडकडाटात ही गाण्यांची मेजवानी सगळ्यांची मनं रिझवत असताना पाहून, *असा विरंगुळा ही गरजेचाच असतो याचा प्रत्यय आला.कार्यक्रम आवडल्यानं शुटिंग फोटोसेशनमध्येही काही रसिक मंडळी रमली होती.

शास्त्रीय संगीताचा प्रवाह त्यातल्या अभिजात सौंदर्याच्या जाणिवेसह खळाळत ठेवण्यामध्ये आणि मुख्यतः लावणी ते अगदी जुन्यानव्या मराठी- हिंदी (अगदी उडत्या चालीच्यादेखील पण बहारदार)चित्रपटातील गाजलेल्या लोकप्रिय गाण्यांमुळे संपूर्ण माहोल बदलून गेला होता ; विशेषतः सध्याच्या काळातील अग्रणी असलेल्या मोजक्या चिंतनशील, तरुण गायकांमध्ये योगिता गोडबोले आणि संदीप उबाळे' ही नावं अग्रेसर आहेत.आणखी महत्त्वाचं म्हणजे साथसंगत करणाऱ्या प्रथमश्रेणीच्या वादकांनी तर अक्षरशः रसिकांची मनं जिंकली. त्या सर्व ज्येष्ठ- श्रेष्ठ वादकांचही अभिनंदन; स्नेहलताई दामले यांचं समयोचित पण प्रासंगिक निवेदन देखील उत्कृष्ट होतं.!

रांगोळी ..आकाशकंदील.. बोधचिन्हे... आणि मान्यवरांच्या उपस्थितीनं... त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या प्रारंभी काका हलवाई यांच्या पेढ्यानं... आणि समारोपानंतर चितळे यांच्या केशरयुक्त दुधानं... सांगता करुन, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी झटणाऱ्या...अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक) पुणे केंदाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या अत्युत्तम व्यवस्थापनानं ...

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त उद्घाटन सोहळ्याचा शुभारंभ दिमाखदारपणे संपन्न झाला... आणखी विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे नाशिक तसेच लोणंद ,नीरा, फलटण अशा पुण्यातील ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची उपस्थितीही लक्षणीय होती; असो ...माझ्या लांबलेल्या मनोगताला (अभिप्राय)विराम देतो ; संस्थेच्या शैक्षणिक- सांस्कृतिक -सामाजिक क्षेत्रातील (देश-देव-धर्म) पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनापासून खूप साऱ्या शुभेच्छा!

आपण सन्मानपत्र देऊन माझाही सत्कार केला ;त्याबद्दल मी,संस्थेचा ऋणी आहे .

आपला स्नेहांकित, राजीव पाटसकर

### भावपूर्ण श्रद्धांजली



अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिकचे कार्याध्यक्ष तसेच तसेच शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन संस्थेचे उपाध्यक्ष, नासिक सार्वजनिक वाचनालयाचे विश्वस्त, भा.ज.प.चे ज्येष्ठ नेते, श्री उदय कुमार मुंगी यांच्या मातोश्री श्रीमती कुमुदिनी दत्तात्रय मुंगी यांचे दिनांक १६-१०-२०२३ रोजी, एक वाजता वृद्धापकाळाने दुखद निधन झाले. ही दुःखद घटना पचवण्याचे सामर्थ्य ईश्वर, श्री उदय कुमार मुंगी आणि परिवारास देवो, आणि त्यांच्या मातोश्री सद्‌गती मिळो ... हीच अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि सभासदांना कडून ईश्वरचरणी प्रार्थना. ओम शांती शांती शांती:

## आणि मला दुर्गा सापडली

सिक्किमजवळच्या पेलिंगला नेमकी आमच्या यांची कॉन्फरन्स घोषित झाली. नवरात्राचे दिवस. यांच्या आग्रहामुळे मला जावच लागलं. मनात मात्र घरचं नवरात्र हुकल्याची हुरहुर होती. आमची गाडी त्या दिवशी सारखा त्रास देत होती. गाडीच्या ड्रायव्हरच्या मावशीचं घर रस्त्यावरच होतं. वळणावळणाच्या त्या रस्त्यावर एका घराशेजारी गाडी थांबली. घरासमोर बरीच मुलं खेळत होती. लहान –मोठी, गोबऱ्या लाल गालांची, बसक्या नाकाची. गाडीचा आवाज ऐकून एक मध्यमवयीन बाई बाहेर आली आणि आमच्या ड्रायव्हर भीमला म्हणाली, ' ताबा तस खै ? ' कसा आहेस ? भीमने आमची ओळख करून दिली. ही कुंती, माझी मावशी. जरा कुरकुरणाऱ्या गाडीची डागडुजी करायला भीम गाडी घेऊन गेला. कुंती अगदी चारचौघींसारखी दिसत होती. सिक्कीमी बायकांचा गुडघ्यापर्यंत येणारा बाखू तिने घातलेला. कान लोंबेपर्यंत, कानाची पाळी फाकवणारे कानातले झुमके, अकाली पडलेल्या सुरकुत्या आणि चेहेऱ्यावर हसू. तिचं वय असेल सहज पन्नाशीला आलेलं. पण कुंती गरोदर होती. या वयाची बाई गरोदर बघून मला धक्काच बसला. एक बारकं मूल तिच्या कडेवर होतं. एक पाठीशी झोळीत बसून तिच्या मागून वाकून मिचमिच्या डोळ्यांनी आमच्याकडे बघत होतं. इतक्यात झोपडीतून नुकतीच चालायला लागलेली, नीट चालणारी पण शेंबूड पुसणारी आणखी दोन तीन पाठोपाठची मुलं बाहेर आली. कुंतीनं आमचं स्वागत केलं. तिने हाक मारल्यावर झोपडीच्या मागच्या उतारावर शेतात काम करणारा एक चौदा पंधरा वर्षांचा मुलगा धावत आला. आणि आम्हाला बसायला त्यानं एक बाक आडवा केला. कुंतीला तोडकं मोडकं हिन्दी येत होत. पण तिथल्या एका मुलाला नीट हिन्दी येत होती. त्याच्या मदतीने आमचा संवाद सुरू झाला.

माझ्या चेहऱ्यावरचं आश्चर्य बघून कुंतीनेच संभाषणाची सूत्र हातात घेतली. ' दीदी , ही सगळी माझीच मुलं. ' ' तुझी म्हणजे, तुझी स्वत:ची ? ' मी उडालेच. ' हो. माझी, माझ्या पोटची. ' पण .. आपला कायदा आहे ना ..दो या तीन .. 'कुंतीला या प्रश्नांची अपेक्षाच असावी. ' हो, आहे ना कायदा. आणि मुलांची संख्या वाढवली तर सरकारवर त्यांचा बोजा टाकायचा नाही, हे ही ठाऊक आहे. माझी मुलं आणि आम्ही स्वावलंबी आहोत. आम्ही आमच्या शेतात राबतो, पिकवतो, रोज कमावतो, रोज खातो, साठवून ठेवायला मात्र आमच्याकडे पैसे नाहीत. ' त्यापुढे कुंतीने जे सांगितलं, ते या पृथ्वीतलावरच वाटलंच नाही मला.

कुंती आणि दोरजा, तिचा नवरा, दोघं पेलिंगच्या कष्टकरी लेपचा जमातीतले. हिमालयाच्या निसर्गरम्य पहाडात हातावर पोट असलेलं त्यांचं कुटुंब. दोरजा सैन्यासाठी लाकूडफाटा सीमेवर पोचवण्याचं काम करायचा. कुंती गावातल्या बायकांबरोबर लाकडं गोळा करायला जायची. देशाला आपली तेवढीच मदत. कुंती कधी दोरजासोबत मिरची – भाकरी सैनिकांसाठी पाठवायची. त्यांचा मोठा मुलगा राम, विसाव्या वर्षीच सैन्यात भरती झाला. कुंतीला त्याचं कोण अप्रूप. सगळ्या गावाला तिने त्याचा गणवेष कौतुकाने फिरून दाखवला. दाजूमुळे ( मोठा भाऊ ) आणि घरातल्या देशप्रेमी वातावरणामुळे धाकट्या दोघांना ही सैन्यात जायचे वेध लागलेले. राम काश्मीर सीमेवर तैनात असताना, अवघ्या बावीसाव्या वर्षी त्याला वीरमरण आलं. हिमालयातला बर्फ वितळेल, असा कुंतीचा शोक चालला होता. तिला मुलगा गेल्याचं दु:ख होतच. पण मुलाची देशसेवा अर्ध्यावर राहिली याची तिला जास्त खंत होती.

कुंतीच्या धाकट्या दोघांनी दाजूचं स्वप्न पूर्ण करण्याचं ठरवलं आणि कुंतीने आपला निर्णय दोरजाला सांगितला. मला देशासाठी लढणारे सैनिक निर्माण करायचे आहेत. नाहीतरी माझ्यासारखी स्त्री देशाची सेवा कशी करणार ? दोरजाने आधी तिला समजावलं. नातेवाईकांना वाटलं ती वेडी झालीये. पण नंतर दोरजाला कुंतीच्या ठाम निर्णयाचा अंदाज आला. मुलांच्या लष्कर भरतीत कुंतीच्या संगोपनाचाच वाटा होता. दोरजाला फक्त कुंतीच्या प्रकृतीची काळजी वाटत होती. कुंती म्हणाली , दोरजा, तू फक्त साथ दे. आपण कष्ट करू, मुलांना स्वावलंबी बनवू. त्यांना देशासाठी घडवू आणि देशालाच अर्पण करू. मला शक्य आहे तोपर्यंत मला हे करू दे. दोरजा म्हणाला, पण एखाद्या मुलाला हे पटलं नाही तर. ' ज्याला नाही पटणार, तो दोन वर्ष देशसेवा करून नंतर आपलं आयुष्य जगू शकतो. माझ्या दुधाचं हे मुलांवर असलेले कर्ज त्यांनी फेडावं, असं सांगेन मी त्यांना . ' आणि कुंतीच्या घरात वर्ष दोन वर्षात पाळणा हलू लागला. ' चांगल्या कामाला निसर्ग ही साथ देतो दीदी. माझं वय काय ठाऊक नाही. पण अजून तरी कूस फळतेय. मुलांना अंगाई म्हणून ही देशाचीच गाणी गाते. माझी मुलं ही फार गुणी आहेत. माझं ऐकतात. आमच्यासारखचं देशाचं प्रेम त्यांनाही आहे. मध्यंतरी भीमाची बहीण वारली. तिच्या नवऱ्याने दुसरं लग्न केलं. पोटच्या पोरांना परकं केलं. मी म्हटलं, आण त्यांना इकडे. आता माझ्या पिल्लांसोबत तिचीही मुलं वाढताहेत. पण अट त्यांनाही तीच. सैन्यात भरती व्हायचं. मुलांना तायक्वंडोचं शिक्षण, रोज पहाडात दौड लावायचा सराव सक्तीचा

केलाय मी. ' ती परत हसली. ' सैन्यात नंबर लागायला हवा ना, म्हणून जरा सक्ख्त आई झालेय. ' कुंती एकीकडे दोन मुलींना आणि एका मुलाला, सैनिकांसाठी भाकऱ्या कागदात बांधायला सांगत होती. दोरजाची गाडी सीमेकडे जायला निघेल म्हणून ती त्यांना घाई करत होती. शेतातल्या भाज्या आणि मिरच्यांचा वानवळा ही सोबत जायचा होता.

हिमालयाच्या कुशीतल्या, बर्फाळ पहाडावर, एक निरक्षर आई, आपलं मातृत्व देशाला अर्पण करत होती. त्यासाठी तिनं स्वत:चं शरीर पणाला लावलं होतं. मला माझीच लाज वाटली. पण माझं नवरात्र हुकलं नव्हतं. आज मनात चांगल्या विचारांची घटस्थापना झाली होती. कुंती हसली. तिच्या सुरकुत्या मला विलक्षण सुंदर दिसल्या. माझी दुर्गा माझ्यासमोर होती.

डॉ. स्मिता दातार

आगळी वेगळी देशभक्ती

**विनम्र आवाहन**

पुणे केंद्रातर्फे गेली ४९ वर्ष सातत्याने इतर कार्यक्रम करत असतांनाच कायमच सामाजिक जाण आणि भान याची जाणं ठेवून असे उपक्रम राबविले जातात. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या पुणे केंद्राचा हा असाच एक अनोखा उपक्रम. दीपावली हा खरं तर आनंदाचा आणि प्रकाशाचा म्हणजेच दिव्यांचा सण. आणि याचे भान ठेवूनच, या घरगुती कामगार महिलांच्या घरी देखील असाच एक आनंदाचा दिवा लावावा या जाणिवेने अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था पुणे केंद्राच्या वतीने

शुक्रवार दिनांक ०३/११/२०२३ रोजी **५० घरगुती महिला कामगारांना भाऊबीज** हा उपक्रम घेण्यात येणार आहे

पुणे केंद्राचे वतीने सर्व सदस्यांना कळविण्यात येते , की आपण प्रत्येकाने आपापल्या घरी काम करीत असलेल्या २ महिला घरगुती कामगारांच्या आधार कार्डची छायांकीत प्रत संपर्क नंबर सहित सोमवार दिनांक ३०/१०/२०२३ पर्यंत संस्था कार्यालयात जमा कराव्यात , म्हणजे पुढील नियोजन करणे सोपे होईल .

" हा उपक्रम *" वरदश्री सभागृह बाजिराव रस्ता , येथे कोथरुडचे आमदार आणि उच्च तंत्र शिक्षणमंत्री व कपडा वस्त्र उद्योग मंत्री मा. श्री . चंद्रकांतदादा पाटील यांचे शुभहस्ते होणार आहे . "

" यावेळी या घरगुती महिला कामगार यांना " पैठणी व मिठाई " देण्यात येणार आहे "

. लवकरात आपल्या आधार कार्डाची छायांकित प्रत आपल्या संपर्क क्रमांकासह जमा करावे, ही विनंती.

आपला,

**मकरंद माणकीकर, केंद्र प्रमुख**

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्यावतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी नवरात्रोत्सवानिमित्त नवचंडी यागाचे आयोजन करण्यात आले होते.**

रविवार दिनांक २२ ऑक्टोबर रोजी महाअष्टमीच्या दिवशी सकाळी ९.०० वाजता नवचंडी यागास गणेश कुलकर्णी गुरुजी आणि त्यांचे सहाध्यायी यांनी मंत्रोच्चारात सुरुवात केली. यागाचे यजमान सौ. व श्री निखिल कुलकर्णी सौ व श्री.रमाकांत कुलकर्णी आणि सौ व श्री डी.डी. आराधी हे



होते.

यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष अनिल देशपांडे, विश्वस्त डॉ.सचिन पाडेकर, प्रविण कुलकर्णी, ॲड.समीर जोशी, सुहास भणगे, सहकार्यवाह उल्हास पंचाक्षरी संस्थेचे कर्मचारी अजित कुलकर्णी नाशिक केंद्राचे पदाधिकारी अनिल नांदुर्डीकर यांनी



याप्रसंगी सहकार्य केले. यावेळी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न...**

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेची वार्षी सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी संस्थेच्या नाशिकस्थित अभ्यंकर सभागृहामध्ये संस्थेच्य उपाध्यक्ष चंद्रशेखर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रारंभी मागील वर्षामध्ये संस्थेचे पदाधिकारी, सभासद, समाजातील मान्यवर यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मागील वर्षी जुन्नर येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संस्थेचे कार्यवाह सुभाष सबनीस यांनी वाचून दाखविले. विषय पत्रिकेवरील विविध विषयांना मंजुरी देतांना अनेक सभासदांनी शंका विचारल्या. या शंकाचे निरसन संस्थेचे कार्याध्यक्ष, कार्यवाह आणि कोशाध्यक्ष




यांनी केले. यावेळी प्रकाश शुक्ल, अनिल नांदुर्डीकर, किशोर कुलकर्णी, वृषाली घोलप, रवींद्र देव, चंद्रशेखर जोशी, चंद्रकांत महाजन, अजित चिपळूणकर यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

फलटण केंद्राचे सदस्य प्रा.विक्रम आपटे यांनी संस्थेला आपला राहता बंगला सप्रेम भेट दिल्याबद्दल त्यांच्या




अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. फलटण केंद्राचे केंद्रप्रमुख श्री भालचंद्र ताथवडकर यांनी यासाठी पाठपुरावा केला त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रामध्ये सन्मान मिळविलेले संस्थेचे अध्यक्ष ॲड अविनाश भिडे, वकिलीची परीक्षा पास झालेले कार्यकारिणी सदस्य सुहास भणगे, संस्थेचे युवा शाखा प्रमुख श्री निखील कुलकर्णी, पंचवटी केंद्राचे सदस्य ॲड. मॅनोज जोशी आणि सभासद रवींद्र बडवे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर सभेचे अध्यक्ष आणि संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रशेखर जोशी, उपाध्यक्ष कुंदनकुमार साठे, कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी, कार्यवाह सुभाष सबनीस, कोशाध्यक्ष अनिल देशपांडे, सहकार्यवाह उल्हास पंचाक्षरी, विश्वस्त सुहास शुक्ल, सचिन पाडेकर आणि गंगाधर कुलकर्णी हे उपस्थित होते. सभेसाठी संस्थेचे नाशिक, फलटण, जुन्नर, पुणे, येथील कार्यकारिणी सदस्य तसेच अनेक केंद्रप्रमुख आणि संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेची सांगता सामुदायिक पसायदानाने झाली.



**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिक पुणे केंद्रास सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त सर्व पदाधिकारी आणि सर्व कार्यकारिणी सदस्य यांचेकडून हार्दिक शुभेच्छा.**

जुन्नर केंद्र च्या वतीने दि २६-१०-२०२३ रोजी कोजागिरी व भोंडल्याचा कार्यक्रम आयोजित केला होता त्याला प्रतिसाद देत ६०-६५ महिला उपस्थित होत्या खेल भोंडला झाल्यावर कार्यक्रम ची सांगता झाली



दिवाळीचा सण
उत्सवाचे संमेलन
पेटवून पणती
धरा झाली पावन

दिवाळीचा सण
लक्ष्मीचे पूजन
नववर्षांचे स्वागत
करू प्रेम सिंचन

दिवाळीचा सण
तम सो मा ज्योतिर्गमय
राग, द्वेश जाळून
होवो कृतार्थ जीवन

दिवाळीचा सण
बंधुत्वाची शिकवण
करून आरती
मन गाभारा प्रसन्न

दिवाळीचा सण
चैतन्याची उधळण
नको दु:खी कोणी
हेच दे दान
– रा. कों. खेडेकर

प्रिय वाचक वर्ग / सभासद आपण अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिकचे मासिक मुखपत्र सन्मार्गमित्र अंकामध्ये विविध समिति सदस्याची माहिती दिली आहे. कृपया विशिष्ट समिति मधील कामाची माहिती देणे किंवा घेणे साठी कृपया आपल्या जवळच्या केंद्र प्रमुखाची संपर्क साधावा. तसेच सन्मार्ग मित्र मुखपत्रासाठी माहिती पाठवण्यासाठी कृपया सन्मार्गमित्र संपादिका सौ. अपर्णा मोडक ८६०५५६६१२८ तसेच सदस्य श्री अनिल देशपांडे ९४२३०३४६८९ यांना व्हट्सआप वर संपर्क साधा.



सर्व सभासद, कार्यकर्ते, समिति सदस्य , केंद्र प्रमुख तसेच वाचकवर्ग यांना अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक चे आध्यक्ष **ॲड. श्री. अविनाश जनार्दन भिडे** व कार्याध्यक्ष **श्री. उदयकुमार दत्तात्रेय मुंगी** याच्या तर्फे येणाऱ्या दीपावली व नववर्ष्याच्या हार्दिक शुभेच्छा.

## कुटुंबातील मॅनर्स

सुई दोरा वापरण्याचा एक नियम पुर्वी पाळला जायचा, अजूनही अनेक घरात असेल. नियम असा असतो की, समजा एखाद्याने दोऱ्याने काही शिवलं आणि ओवलेला दोरा संपला तर त्याने परत सुईत दोरा ओवून गाठ मारुन तो नीट रिळाला गुंडाळून ठेवायचा. दुसऱ्याला सुईला दोरा लावलेला मिळतो, त्याचं काम झालं की त्यानं परत तेच करायचं.

पुर्वीच्या काळी पाण्याचे बंब असायचे. एकत्र कुटुंब असायचं. गरम पाण्याच्या बाबतीतही हा नियम असायचा की जो बंबातून पाणी घेईल त्यानं अंघोळीला जाण्यापुर्वी दुसऱ्यासाठी बंबात पाणी भरायचं. दुसऱ्यानं तिसऱ्यासाठी, जेणेकरुन वेळ आणि इंधन बचत व्हायचीच पण गैरसोयही टाळता यायची.

सुबत्ता वाढत गेली तसतशी एकमेकांवर अवलंबून जगण्याची जीवन शैलीही बदलत गेली. आता दुसऱ्याचा विचार करण्याची वेळ वारंवार येत नाही, पण याचा अर्थ तो करायचाच नाही असं मात्र नाही.

आपला पेपर वाचून झाला की त्याच क्रमानं नीट पुरवणी आत ठेऊन निश्चित जागी ठेवला तर दुसऱ्याला ताजा पेपर वाचल्याचा फील येतो नि शोधाशोध पण करावी लागत नाही.

पाण्याची बाटली आपण रिकामी केली तर लगेच भरुन फ्रीज मधे ठेवली तर ही साखळी चालू राहून एकालाच हे काम करावं लागत नाही.

बेसिन पाशी हॅंडवॉश संपत असतं. ज्याला कळेल त्यानं रिफिल करायचं हा नियम केला तर कोणालाही त्रास होणार नाही.

पाण्याचा ग्लास, चहाचे कप आपापले धुवून, घासून ठेवायचे हा नियम घरात पाळला तर भांडी कमी साठतील.

खाऊ, फळं, नियमित खाल्ले जाणारे पदार्थ किंवा कात्री, स्टेपलर, सेलोटेप सारख्या वस्तू एकाच जागी ठेवणे. आपली टर्न आल्यावर संपल्या नि बिघडल्या तर आठवणीने आणणे, ही काळजी घेणे.

घर सगळयांचं असतं. सगळी जवाबदारी गृहिणीची असं म्हणून जवाबदारी झटकून न टाकता एकत्र रहाण्याचे मॅनर्स सगळयांनीच शिकायची गरज आहे. प्रेमात आणि नात्यात एकमेकांसाठी कामं केली जातात पण त्यामुळेच एकत्र जगण्याच्या शिस्तीला तडा जातो नि चुकीच्या सवयी लागतात.

घर ही एक संस्था समजून घराची एक शैली एक नियमावली जरुर तयार करा. हे एक लहानसं युनिट समजा. देशात अराजकता माजू नये म्हणून कायदे असतात तसे घरातही काही नियम असले पाहिजेत तरच त्याचं हॉटेल होणार नाही (खरंतर हॉटेलचे सुध्दा नियम असतातच).

ही एक संधी आहे. घराला घरपण देण्याची. सगळे घरात आहेत, काही एकत्र सवयी लावून घेतल्या तर भविष्यात नक्कीच फायदा होईल.

आपल्या घरामध्ये कोणाचाही फोन आला तर एकमेकांना त्यांचे निरोप न विसरता देणे घरातील कोणाकडेही मित्र मैत्रीण आल्यास त्यांचे यथोचित स्वागत करणे घरी येणारी व्यक्ती ही कुटुंबाची मैत्री आहे समजून त्यांचे आदरा तिथ करूया. घरातील प्रत्येक वस्तूवर व्यक्तींची नावे असलीच पाहिजेत असे नाही. बहुतेक सर्व वस्तू कॉमन असतात. त्याला ही घर पण म्हणतात.तसेच घरातील कोणतीही खाण्यापिण्याची वस्तू संपविण्यापूर्वी कोणी खायचे राहिले नाही ना ? अशी चौकशी करावी. घरातील प्रत्येकाचे दिवसभराचे काम अंदाजे वेळापत्रक उद्योगातील आर्थिक व्यवहार एकमेकांना माहिती असण्याची आवश्यकता आहे.

कुटुंबातील माहेरची किंवा सासरची व्यक्ती असो सर्वांचे समान आदरातीथ्य असावे अशा प्रकार च्या गोष्टींना कुटुंबातील मॅनर्स किंवा संस्कार असे म्हणतात, याचे खूप चांगले परिणाम पुढील पिढीवर होतात.

संस्कार संस्कार म्हणजे आणखी वेगळं काही नसतं.

**सौजन्य – व्हाटस्अप विद्यापीठ**

**संस्थेचे कार्य सुरळीत चालण्याच्या दृष्टिकोनातून विविध समित्याची नेमणूक करण्यात येत आहे.**
**समित्या तसेच त्यातील सदस्य पुढील प्रमाणे**

### १) घटना समिती

| | |
|---|---|
| ॲड. अविनाश भिडे | **प्रमुख** |
| श्री. चंद्रशेखर जोशी | **सदस्य** |
| ॲड. संयोगिता पागे | **सदस्य** |
| ॲड. समीर जोशी | **सदस्य** |
| श्री. अनिल देशपांडे | **सदस्य** |
| श्री.प्रवीण कुलकर्णी | **सदस्य** |
| श्री. अनिल शिदोरे | **सदस्य** |
| श्री.सुहास भणगे | **सदस्य** |

श्री. अजित चिपळूणकर **सदस्य**

## २) बांधकाम देखभाल दुरुस्ती समितीची

श्री. अनिल देशपांडे **प्रमुख**
श्री. प्रवीण कुलकर्णी **सदस्य**
श्री. सुहास शुक्ल **सदस्य**
डॉ. सचिन पाडेकर **सदस्य**
श्री. अजित चिपळूणकर **सदस्य**

## 3) सन्मार्गमित्र सल्लागार समिती

ॲड. संयोगिता पागे **प्रमुख**
ॲड. समीर जोशी **सदस्य**
श्री. अनिल देशपांडे **सदस्य**
सर्व केंद्र प्रमुख **सदस्य**

## ४) वसतिगृह समिती

श्री.प्रवीण कुलकर्णी **वसतिगृह प्रमुख व समिती प्रमुख**
श्री.सुहास भणगे **सदस्य**
श्री. सुहास शुक्ल **सदस्य**
श्री. अनिल शिदोरे **सदस्य**

वरील सर्व समितीचे **कार्याध्यक्ष व कार्यवाह** हे **पदसिद्ध सदस्य** असतील.

# संस्थेची कार्यालये



### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

तिवधा, शुक्ल वाडा जुने नाशिक ,
केंद्र प्रमुख :श्री. महेश गंगाधर शुक्ल.
मो. ९८८११२४१४४

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक



मखमलाबाद नाका राजपाल कॉलनी,
कृशाकुंज बंगला , मधुबन कॉलनी,
पंचवटी, नाशिक ४२२००३
केंद्र प्रमुख : श्री. चंद्रशेखर अशोक जोशी.
मो. ९३७००६६६२८

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, लोणंद (ग्रामीण )



लोणंद, भादे ता. खंडाळा,
जि. सातारा. ४१५ ५२६
केंद्र प्रमुख : श्री. प्रकाश विनायक देशपांडे
मो: ९८६०८७४२३७

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरवळ



रा. लक्ष्मी नगर , बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी,
मु. पो. शिरवळ , ता. खंडाळा,
जि. सातारा ४७१२८०१
केंद्र प्रमुख.: मदनमोहन भालचंद्र गोखले
मोबाईल:९७६४२२० ३७६

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे



१२७३, सदाशिव पेठ, गुजराती बिल्डिंग,बाजीराव रोड लागत, नवा विष्णू चौक, पुणे ४११०३०
केंद्र प्रमुख : श्री. मकरंद माणकीकर.
मो. ९७६३१९१२०० ०२० २४४३६९२२

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण



११८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा,
केंद्र प्रमुख :श्री.. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर
मो. ९८६०७२८६९८.

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर



घर नं ३७, वरली आळी, श्रीराम मंदिर,
ता. जुन्नर, जिल्हा पुणे ४१०५०२
केंद्र प्रमुख : श्री. हरीष शांताराम भवाळकर.
मो ९८८१६६६१९५

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा



वार्ड २, समर्थ बंगला ,बाजार तळ,मराठी शाळे मागे नीरा, ता. पुरंदर जि पुणे ४१२१०२
केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे
मोबाईल:९८२३३२६६८४,

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, करमाळा



प्लॉट नं.२६.कमलादेवी औद्यागिक सहकारी वसाहत
ता. करमाळा. जिल्हा .सोलापूर ३१३२०३
केंद्र प्रमुख. संतोष मुरलिधर कुलकर्णी.
मोबाइल : ८२७५४४८०६९

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, आकलूज



मु. पो. यशवंत नगर , ता. मळशिरस,
आकलूज , जि. सोलापूर
केंद्र प्रमुख : श्री. विजय वसंत कुलकर्णी
मोबाइल : ७२४९२९०००४

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था
# आणि समाज सहाय्यक संस्था, नाशिक

रजि. नं. इ-२८२

## कार्यकारिणी



ॲड. श्री. अविनाश जनार्दन भिडे
अध्यक्ष



श्री. चंद्रशेखर रामचंद्र जोशी
उपाध्यक्ष



श्री. कुंदनकुमार यशवंत साठे
उपाध्यक्ष



श्री. उदयकुमार दत्तात्रेय मुंगी
कार्याध्यक्ष



श्री. सुभाष प्रभाकर सबनीस
कार्यवाह



श्री. अनिल मोहिनीराज देशपांडे
कोषाध्यक्ष



श्री. उल्हास एकनाथ पंचाक्षरी
सहकार्यवाह



श्री. सुहास गोपाळ शुक्ल
आधारस्तंभ



श्री. गंगाधर नारायण कुलकर्णी
आश्रयदाते



श्री. प्रवीण प्रह्लाद कुलकर्णी
सदस्य



डॉ. श्री. सचीन सुरेश पाडेकर
देणगीदार



श्री. समीर चिंतामणी जोशी
सदस्य



सुहास माधवराव भणगे
सदस्य



श्री. सारंगधर गोपाल अभ्यंकर
सदस्य



श्री. अनिल प्रभाकर शिदोरे
सदस्य



श्री. परेश यशवंत मेहेंदळे
सदस्य



सौ. संयोगीता नितीन पागे
सदस्य



सौ. मानसी अनिरुद्ध फडके
सदस्य



श्री. मुकुंद लक्ष्मण राक्षे
सदस्य



श्री. सुभाष शंभुराव कुलकर्णी
सदस्य



श्री. चंद्रशेखर मधुकर दाणी
सदस्य